# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:27.10.2025** **वार:सोमवार**

---

1. 'वंदे मातरम्' या गीतानं देशभक्तीच्या भावनेला मूर्त स्वरूप दिलं-मन की बातमधून पंतप्रधानांचे गौरवोद्गार
2. इंडिया मेरीटाईम वीकचं आज मुंबईत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन
3. आंतरराष्ट्रीय सौर आघाडीच्या आठव्या अधिवेशनाचं आजपासून नवी दिल्लीत आयोजन
4. आयसीसी महिला क्रिकेट स्पर्धेत भारत-बांग्लादेश सामना पावसामुळं अनिर्णित आणि
5. संभाव्य चक्रीवादळ 'मोंथा' च्या पार्श्वभूमीवर ओडिशा आणि आंध्रप्रदेशात अतिदक्षता

**मन की बात**

देशभक्ती ही शब्दांच्या पलीकडे असलेली भावना आहे आणि 'वंदे मातरम्' हे त्या अमूर्त भावनेला मूर्त स्वरूप देणारं, ऊर्जेचा प्रेरणास्रोत असणारं गीत आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. ते काल आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधत होते. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 19व्या शतकात वंदे मातरम् लिहिलं असलं तरी त्याची भावना हजारो वर्षे जुन्या भारताच्या अमर चेतनेशी जोडलेली आहे, असं सांगून मोदी म्हणाले.....

**7 नवंबर को हम 'वन्देमातरम्' के 150वें वर्ष के उत्सव में प्रवेश करने वाले हैं। 150 वर्ष पूर्व 'वन्देमातरम्' की रचना हुई थी और 1896 (अट्ठारह सौ छियानवे) में गुरुदेव रवीन्द्रनाथ टैगोर ने पहली बार इसे गाया था। 'वन्देमातरम्' के गान में करोड़ों देशवासियों ने हमेशा राष्ट्र प्रेम के अपार उफान को महसूस किया है। 'वन्देमातरम्' हमारे इन प्रयासों में हमेशा हमारी प्रेरणा बनेगा।**

येत्या 7 नोव्हेंबरला वंदे मातरम् गीताला 150 वर्ष पूर्ण होत आहेत, यानिमित्त देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार आहेत, यासाठी नागरिकांनी VandeMatram150 या हॅशटॅगसह आपल्याला सूचना पाठवाव्यात असं आवाहनही पंतप्रधानांनी केलं.

संस्कृत भाषेचं महत्त्व, तिच्या संवर्धनासाठी होत असलेले प्रयत्न या विषयीही पंतप्रधानांनी भाष्य केलं. गुलामगिरीच्या काळात आणि स्वातंत्र्यानंतरही संस्कृतकडे सातत्याने दुर्लक्ष झालं. मात्र आता सोशल मीडियाच्या जगानं संस्कृतला नवीन जीवन दिलं आहे, हे अत्यंत आनंददायक असल्याचं ते म्हणाले. समाजमाध्यमावर संस्कृत भाषेतून रील्स प्रसारित करणाऱ्या यश साळुंके या तरुण संस्कृतप्रेमीचा त्यांनी उल्लेख केला. याबाबत आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना यश म्हणाला....

**माझा ओव्हरऑल हाच एक उद्देश आहे, की सगळ्या भारतीयांनी आपली जी प्राचीन भाषा आहे, त्याबद्दल थोडा तरी अभ्यास करावा. कारण याच भाषेमध्ये जेव्हा आपण विश्वगुरु होतो, तेव्हा आपल्या पूर्वजांनी जेवढं पण ज्ञान अर्पित केलं होतं, ते त्यांनी याच भाषेमध्ये लिहून ठेवलं आहे. तर माझा हाच एक उद्देश आहे, की सगळ्या भारतीयांनी थोडी तरी संस्कृत जाणावी आणि तुम्ही क्रिकेट खेळतो प्रोफेशनली, तर मी क्रिकेट आणि संस्कृतला कंबाईन करून एक रील बनवली होती तर ती त्यांना फार आवडली आणि ती त्यांनी मन की बातमध्ये दाखवलं याबद्दल मला खूप खूप आनंद वाटतो.**

येत्या 31 ऑक्टोबरला लोहपुरुष सरदार पटेल यांच्या जयंतीदिनानिमित्त त्यांच्या कार्याचं स्मरण पंतप्रधानांनी केलं, यानिमित्त देशभरात आयोजित होणाऱ्या 'रन फॉर युनिटी'मध्ये सहभागी होण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

दिवाळी आणि छट पूजेसारख्या सणासुदीच्या काळात देशभरात जीएसटी बचत महोत्सव सुरू आहे, यामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह आहे, असं मोदी म्हणाले. स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाविषयीच्या अभिनव उपक्रमांबद्दल पंतप्रधानांनी माहिती दिली. सागरी परिसंस्थेच्या जतन संवर्धनासाठी खारफुटीचं महत्व त्यांनी अधोरेखित केलं. एक पेड़ माँ के नाम ही मोहीम आणखी पुढे न्यावी, असं आवाहनही त्यांनी केलं.

## अमित शहा

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज मुंबईत इंडिया मेरीटाईम वीक 2025 उद्घाटन होणार आहे. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालय तसंच भारतीय बंदरे संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या पाच दिवसांच्या कार्यक्रमात शाश्वत सागरी वाढ, व्यापार विस्तार, नील अर्थव्यवस्था विकास, जहाजबांधणी, लॉजिस्टिक्स आणि सागरी तंत्रज्ञानातील संधींवर चर्चा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात भारतासह परदेशातील सागरी उद्योगातील तज्ञ, धोरणकर्ते, गुंतवणूकदार, नवोन्मेषक आणि भागधारक सहभागी होत आहेत. जागतिक सागरी केंद्र म्हणून भारताचे स्थान मजबूत करणे आणि या क्षेत्रात सहकार्य, नवोन्मेष आणि धोरणात्मक संवादाला प्रोत्साहन देणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकूर यांच्यासह महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी हेही उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमानंतर, केंद्रीय मंत्री अमित शाह मुंबईतल्या माझगाव डॉक इथं अत्याधुनिक खोल समुद्रातील मासेमारी जहाजांचं वितरण करणार आहेत.

## सौर

आंतरराष्ट्रीय सौर आघाडीच्या सभेचं आठवं अधिवेशन आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं सुरू होत आहे. या चार दिवसीय कार्यक्रमात 124 देश सहभागी होत असून जगभरातील 40 हून अधिक मंत्री सहभागी होतील. हा कार्यक्रम जागतिक समुदायाला उज्ज्वल आणि शाश्वत भविष्यासाठी सौर ऊर्जा स्वीकारण्यास गती देण्यासाठी एकत्र आणण्यात महत्वाची भूमिका बजावेल. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा सौर ऊर्जा उत्पादक आणि

अक्षयऊर्जा वाढीसाठी जगातील दुसरी सर्वात मोठी बाजारपेठ आहे. पंतप्रधान सूर्य घर मोफत योजनेअंतर्गत देशातील 20 लाखांहून अधिक कुटुंबांनी सौर ऊर्जेचा लाभ घेतला आहे.

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी काल सेशेल्सचे नवे राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांच्या शपथविधी समारंभाला उपस्थिती होते. या दोन दिवसांच्या दौऱ्यात राधाकृष्णन यांनी सेशेल्समध्ये मॉरिशसचे पंतप्रधान डॉ. नवीनचंद्र रामगुलाम यांचीही भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी भारत-मॉरिशस द्विपक्षीय संबंधांना आणखी मजबूत करण्याच्या मार्गांवरही चर्चा केली.

**परराष्ट्रमंत्री**

परराष्ट्र मंत्री एस जयशंकर आज मलेशियातील क्वालालंपूर इथं होणाऱ्या 20 व्या पूर्व आशिया शिखर परिषदेत भारताचं प्रतिनिधित्व करणार आहेत. या शिखर परिषदेत इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील शांतता, स्थिरता आणि समृद्धीसमोरील आव्हानांवर तसंच प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींवर विचार विनिमय करण्यात येणार आहे. दरम्यान काल डॉ. जयशंकर यांनी सिंगापूरचे परराष्ट्र मंत्री विवियन बालकृष्णन यांची भेट घेऊन आणि भारत-सिंगापूर यांच्यातील सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी चर्चा केली. तसंच जयशंकर यांनी मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांची आणि दक्षिण कोरियाचे परराष्ट्र मंत्री चो ह्युन यांची भेट घेतली.

**उद्योगमंत्री**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आज बेल्जियममधल्या ब्रुसेल्सच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात ते युरोपियन युनियनचे कार्यकारी उपाध्यक्ष आणि युरोपियन व्यापार आयुक्त मारोस सेफकोविक यांच्याशी चर्चा करतील. सध्या सुरू असलेल्या भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटींच्या पार्श्वभूमीवर ही भेट होत आहे. या भेटीदरम्यान दोन्ही नेते भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील व्यापार आणि आर्थिक भागीदारी सक्षम करण्यासाठी सविस्तर चर्चा करतील.

**छठपूजा**

4 दिवस चालणाऱ्या छठ पूजा उत्सवाचा आज तिसरा मुख्य दिवस आहे. आजच्या दिवशी मावळत्या सूर्याला अर्घ्य देण्यात येतं, याला संध्या अर्घ्य असं म्हणतात. या दिवशी भाविक नदीकाठ किंवा जलाशयांवर एकत्र येऊन मावळत्या सूर्याला अर्घ्य अर्पण करून प्रार्थना करतात.

**शौर्य दिन**

आज 79 वा शौर्य दिन साजरा करण्यात येत आहे. भारतीय सशस्त्र दलांच्या शौर्य आणि अदम्य साहसाचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी 27 ऑक्टोबर रोजी शौर्य दिवस साजरा केला जातो. 1947 मध्ये याच दिवशी, भारतीय सैन्यानं श्रीनगरमध्ये आक्रमकांना हुसकावून लावून जम्मू आणि काश्मीरला पाकिस्तानी आक्रमणापासून वाचवलं होतं. या शौर्य दिनानिमित्त काल नवी दिल्लीत लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी शौर्य वीर-रन फॉर इंडिया 2025 ला

हिरवा झेंडा दाखवला. या कार्यक्रमात लष्करी अधिकारी, सैनिक, खेळाडू आणि नागरिकांसह 10,000 हून अधिक धावपटू सहभागी झाले होते.

**महिला**

आयसीसी महिला विश्व करंडक स्पर्धेत काल नवी मुंबईतील भारत-बांग्लादेश दरम्यानचा सामना पावसामुळं अखेर अनिर्णित राहिला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांग्लादेशनं मर्यादित 27 षटकांमध्ये 9 बाद 119 धावा केल्या. भारतीय महिलांनी नाबाद 57 धावांपर्यंत मजल मारली असताना पाऊस थांबण्याचं चिन्ह नव्हतं, त्यामुळं सामना अनिर्णित ठेवावा लागला.

**वादळ**

आग्नेय बंगालच्या उपसागरावरील 'मोंथा' हे चक्रीवादळ सुमारे 6 किलोमीटर वेगानं पश्चिम-वायव्य दिशेनं सरकत आहे. उद्या संध्याकाळी किंवा रात्री आंध्रप्रदेशात काकीनाडाच्या आसपास ते आणखी तीव्र चक्रीवादळात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर ओडिशा आणि आंध्रप्रदेशात अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे.

**हवामान**

कोकणात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली. कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. दरम्यान, राज्यातील समुद्रकिनाऱ्यावरील सर्व मच्छीमारांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून समुद्रामध्ये असलेल्या सर्व मासेमारी नौकांनी तात्काळ बंदरात परत यावं तसंच स्थानिक बंदर अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार...**